REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# वेब 2.0 आणि ग्रंथालयीन सेवा

एकनाथ रेशमाजी वाठोरे
ग्रंथपाल, डांग सेवा मंडळ, कला महाविद्यालय अभोणे ता. कळवण जि. नाशिक

**सारांश :**

आजचे युग हे माहितीतंत्रज्ञानाचे आहे. इंटरनेटमुळे प्रत्येक क्षेत्रामध्ये झपाटयाने प्रगती झाली आहे. वाचकाला हवी ती माहिती क्षणात मिळत असल्यामुळे ,संपूर्ण विश्व एका क्लिकवर आलेले आहे. इंटरनेट किंवा वेब तंत्रज्ञानाचा आढावा घेतल्यास आपल्या लक्षात येईल की, गेल्या तीन ते चार दशकामध्ये माहितीतंत्रज्ञानाचा विकास वेगाने झालेला आहे. इंटरनेटच्या पिढया वेब 1.0 , वेब 2.0, वेब 3.0 या संज्ञानी आज ओळखल्या जातात. वेब 2.0 तंत्रानी आज सर्वच क्षेत्र व्यापले आहे, यात ग्रंथालय क्षेत्रदेखील अपवाद नाही. ग्रंथालयामध्ये वेब 2.0 तंत्रज्ञानाचा कशा प्रकारे उपयोग केला जाउ शकतो याबाबत या लेखात विवेचन केले आहे.

**शोधसंज्ञा :**वेब , आरएसएस फिडस, वेब्लॉग्ज, विकीज, फ्लिकर, पोडकास्टीग.

## प्रस्तावना :

माहिती तंत्रज्ञानातील तीन महत्वाचे घटक म्हणजे संगणक, दळणवळणआणि इंटरनेट. या तिन्हीचा एकत्रित परिणाम म्हणजे माहितीतंत्रज्ञानाचा झालेला जलद विकास होय. माहितीतंत्रज्ञानाच्या प्रगतीचा परिणाम ग्रंथालयाच्या कामकाजावर व सेवेवर झालेला आपणास दिसून येतो आहे. इंटरनेट तंत्रज्ञानामुळे ग्रंथालय क्षेत्रामध्ये क्रांती झाली आहे. इंटरनेट तंत्रज्ञानाचा आढावा घेताना वेब 1.0 ,वेब 2.0 या संज्ञानी ओळखल्या जातात. वेब 1.0 ही इंटरनेटची पहिली पायरी किंवा पहिली पिढी समजली जाते, तर इंटरनेटच्या दुसऱ्या पिढीच्या तंत्रज्ञानास वेब 2.0 म्हणतात. वेब 2.0 हे वेब 1.0 तंत्रज्ञानापेक्षा खुप प्रगत आणि विस्तृत तंत्रज्ञान असून अनेक तंत्रज्ञानाचा तो एक समुह आहे. या समुहामध्ये ब्लॉग्ज, आरएसएस फीडस, सोशल नेटवर्कींग,वीकीज, टॅगींग, पोडकास्ट, मॅशप, फ्लिकर, शेअर व्हिडीओ, यासारखे अनेक तंत्रज्ञान, आज्ञावली व वेब माहितीसेवा उपलब्ध आहेत. वेब 2.0 चे वैशिष्टये म्हणजे माहितीचा वाचकाकडे प्रवास होय. इंटरनेट व इतर प्रगत साधनांचा विविध क्षेत्रामध्ये माहिती सादर करण्यासाठी वापर केला जातो. ग्रंथालयीन क्षेत्रात वेब 2.0 वापरासाठी लायब्ररी 2.0 असे संबोधले जाते.

## वेब 2.0 तंत्रज्ञानाची ओळख :

वेब 2.0 ची संकल्पना प्रथमत टीम ओरॉयली आणि डेलडोगर्थी यांनी सन 2004 साली मांडली. हे दोघे संगणक तज्ञ म्हणून कार्यरत होते. सन 1990 साली कंपन्याचे शेअर कोसळल्यामूळे डॉटकॉम तंत्रज्ञानाची मर्यादा स्पष्ट झाली. त्यामूळे ही गरज ओळखून दोन्ही संगणक अभियंत्यानी पुर्विपेक्षा जलद आणि सुरक्षित 2.0 तंत्रज्ञानाची निर्मिती केली.



## वेब 2.0 तंत्रज्ञानाची वैशिष्टये :

1) वेब हा एक प्लॅटफॉर्म आहे. 2) सामुदायिक बुध्दी कौशयल्ये 3) इंटरनेट तंत्रज्ञान उपायोजनाबरोबर डेटाची उपलब्धतता. 4) आज्ञावलीच्या चक्रातून सूटका 5)वापरकर्त्यासाठी समृध्द अनुभव

## व्याख्या :

विकीपेडीया ऑनलाईन विश्वकोशाने 2006 मध्ये वेब 2.0 ची व्याख्या सादर केली आहे ती पुढीलप्रमाणे,

वेब 2.0 हे इंटरनेट आधारीत सेवांची प्रगत दुसरी पीढी असून ज्यामध्ये पुढील तंत्रज्ञानाचा समावेश आहे. उदा. आरएसएस फीडस (RSS Feeds), वेब्लॉग्ज (Weblogs), इन्स्टंट मेसेजिंग(Instant Messeging),स्टिमिंग मेडीया (Streeming Media), वीकीज (Wikis), सोशल नेटवर्कर्स (Social Networks), टॅगींग (Tagging), फ्लिकर (Flicker),

## वेब 2.0 तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रंथालयात समाविष्ट असणाऱ्या सेवा :

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात वेब 2.0 तंत्रज्ञानाचा उपयोग करून अद्ययावत सेवा वाचकांना पुरविल्या जात आहेत त्या पुढीलप्रमाणे आहेत.

## आरएसएस फीडस (RSS Feeds)

बऱ्याच संकेत स्थळावर आरएसएस अक्षराची केशरी रंगातील लिंक बघावयास मिळते. अशी लिंक म्हणजे आरएसएस फीडस होय. आरएसएस फीडस त्याविषयी वाचकांना सेवा देवू शकते. वाचक या लिंकवर क्लिक वरून व त्यात स्वतःचा ईमेल आयडी नोंदवून ज्या मथळयासंबंधी माहिती हवी आहे ती माहिती मिळवू शकतात. तसेच त्याविषयासंबंधी नव्याने सादर होणारी माहिती संबंधित वाचकांना ई मेल द्वारे पाठवीली जाते. वाचकाला अशी सेवा सूरू करण्यासाठी एकदाच त्या वेबसाईटवर जावे लागते. तसेच उपलब्ध असणारी सेवा वाचकाला बंद करावयाची असेल तर तसी सोय उपलब्ध करून दिलेली असते. ही सेवा ग्रंथालयाच्या बाबतीत देता येईल, ग्रंथालयाच्या बेसाईटवरून अशी सेवा द्यावयाची असल्यास,ज्या संदर्भात ही सेवा द्यावयाची आहे त्या मथळयासंबंधी आरएसएस फीडस लिंक तयार कराव्या लागतील. यासेवेअंतर्गत वाचकांना नवीन ग्रंथाची यादी, ग्रंथेत्तर साहित्य तसेच नियतकालिकांची यादी, नवीन सेवेसंबंधी माहिती, वाचकांसाठीच्या सूचना, मिळाल्यामुळे वाचकांचा ग्रथालयाशी सतत संपक राहील.

## विकीज :

विकी म्हणजे ऑनलाईन निर्मितीक्षम वेबपेज. कोणत्याही वाचकाला विकीच्या वेबसाईटवर जावून नांव नोंदवता येते. या प्रकारच्या विकीजमधुन मोठया प्रमाणात माहितीची निर्मिती होते आणि ही माहिती विकीमध्ये समाविष्ट करता येते. विकीजवर नियंत्रण ठेवण्यासाठी संपादक असतो. त्यामुळे विकीमधील समाविष्ट झालेल्या माहितीचा दर्जा सुधारण्यास मदत होते. ग्रंथालय अशा प्रकारचे विकी तयार करू शकतात व विकीजमधील महिती ही केवळ मजकूर स्वरूपात न ठेवता ती ऑडीयो ,व्हिडीओ, किंवा ॲनिमेशन स्वरूपात सादर करता येत.

उदा. LIS Wikihttp://liswiki.org/wiki/main

## इन्स्टंट मेसेजिंग (Instant Mesaging) :

आजच्या माहितीतंत्रज्ञानाच्या युगात इन्स्टंट मेसेजिंग सर्वांना माहित आहे. इन्स्टंट मेसेजिंग वापरून ग्रंथालयातून संदर्भसेवा देता येतात, यास आभासी संदर्भसेवा असे म्हणतात. ही सेवा वाचकांना देण्यासाठी वेबवरील उपलब्द्ध असनारे सॉफ्टवेअर वापरून ग्रंथालय संकेतस्थळावर त्याची लिंक वाचकांना उपलब्ध करून दिली जाते. वाचक या लिंकच्या माध्यमातून संदर्भग्रंथपाल सोबत प्रश्न विचारले जातात. सदर सेवा ऑनलाईन असल्यामुळे ग्रंथपाल एकावेळी एकापेक्षा अधिक वाचकांशी संपक करू शकतो. आता बऱ्याच ग्रंथालयात इन्स्टंट मेसेजिंगचा वापर संदर्भासेवेसाठी करण्यात यतो.

उदा.saintjosephpublic library : http://www.libraryforlife .org/asksjcpl

## टॅगींग (Tagging) :

टॅगींग तंत्रज्ञानामुळे वाचकाना अनेक सुविधा प्राप्त झालेल्या आहेत. वेबवरील डेटा हाताळताना त्यातील मेटाडेटामध्ये आपल्या सोयीप्रमाणे बदल करण्याची सोय टॅगींग तंत्रज्ञानामुळे वाचकाना शक्य होते. ग्रंथालयातील ओपेक हाताळताना स्वतः नवीन संज्ञा तयार करता येतात. त्यामुळे शोधप्रक्रिया परिणामकारक होते.

उदा Library Thing http://www.librarything.com/work, University of Pennsylvania http://tags.library.upenn.edu

## सोशल नेटवर्कींग (Social Networking) :

वेब 2.0 तंत्रज्ञानाने लोकाना सोशल नेटवक तंत्रज्ञान वापरण्याची सूवर्णसंधी निर्माण केलेली आहे. या तंत्रज्ञानाद्वारे इन्स्टंट मेसेजिंग, ब्लॉगींग, स्टिमिंग मिडीया यासर्व तंत्रज्ञानाचा एकत्रित परिणाम साधता येतो. सोशल नेटवकच्या माध्यमातून माहितीचे स्त्रोत निर्माण करता येतात. सोशल नेटवकींगमधील सेवा व्यावसायिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या लोकाना एकत्र आणून त्यांच्याकडे असणाऱ्या ज्ञानाची व अनुभवाची देवाणघेवाण करण्यास मदत करतात. ग्रंथालयात सोशल नेटवर्कींगचा उपयोग वाचकांचा समुह तयार करण्यासठी करता येईल, यामुळे ग्रंथालयातील माहितीस्त्रोत वापरंण्यातील कौश्यल्ये समुहातील इतर सदस्यांना शेअर करता येतील. त्यामुळे ग्रंथालयातील वाचणसाहित्य वापरण्याचे प्रमाण वाढू शकते.

उदा. University Library http://www.facebook.com/pages/bryantuniversity

Brooklyn college library http://www.myspace.com/brooklyn collegelibrary

## फ्लिकर (Flicker) :

फ्लिकर हे वेब 2.0 तंत्रज्ञानातील फोटो किंवा चित्राची देवाणघेवाण क रण्यास वापरले जाणारे वेबतंत्रज्ञान आहे. फ्लिकरद्वारे नकाशे (Maps) व भौगौलिक माहितीचे आदानप्रदान करता येते. फ्लिकर निर्माण करण्यासाठी www.flicker.com हा स्त्रोत वापरला जातो, व त्यात फोटो स्वरूपात माहिती नोंदवीली जाते. वापरकर्त्यांना यामुळे फोटो शोधता येतात. या साईटमध्येच इतर वेबसाईटच्या लिंक उपलब्ध करता येतात. उदा. Tours, event, local history, community, publicity इत्यादी.

## पोडकास्टिंग (Podcasting):

पोडकास्ट म्हणजे संगणकातील फाईलीस दिलेले नांव असते. ज्यामध्ये लेखकाचे साहित्य त्याच्याच आवाजात ध्वनिमुद्रित के लेले असते. असे साहित्य संगणकाच्या सहाय्याने ऐकता यते. किंवा Mp3 मध्ये साठविता येते. ग्रंथालयामध्ये पोडकास्टींगचा चांगल्या प्रकारे उपयोग करता येतो. उदा. ग्रंथपालाची मुलाखत रेकॉर्डीग करण्यासाठी व इतराना ऐक वण्यासाठी पोडकास्टींगचा उपयोग होतो, Library audio tour, Library instruction guide, Library events. अशाप्रकारे पोडकास्ट निर्मितीमध्ये वाचकांचा सहभाग घेवून ग्रंथालयात या तंत्रज्ञानाचा वापर प्र**भा**वीपणे करता येतो.

उदा. Denver library http://podcast.denverlibrary.org

## वेब्लॉग्ज (Weblogs):

वेब्लॉग्ज किंवा ब्लॉग्ज म्हणजे स्वतःच्या साहित्य प्रकाशनाची सोय तसेच नवीन विषयावर वेबद्वारे चर्चा करण्याची सोय उपलब्ध करून देणे होय. वेब 2.0 तंत्रज्ञानाअंतर्गत ब्लॉगचा वापर करून स्वतःचा ब्लॉग तयार करता येतो व तो इंटरनेटवरून प्रसारित करता येतो. इतर विषयाचे विविध ब्लॉग्ज शोधता येतात. ब्लॉग्जवर आपली प्रतिक्रि या नोंदविता येते. नामांकित व्यक्ती सतत ब्लॉग्ज लिहित असतात व वाचकांना वाचण्यासाठी उपलब्ध असतात. ब्लॉग्जना ऑनलाईन डायरी असेही म्हणतात. मुळ लेखक आपले लिखान किंवा नवीन विषयावर स्वतःचे मत नोंदवून ब्लॉगची निर्मिती करतात, व इतर तज्ञ व्यक्ति अशा ब्लॉग्जवर चर्चा घडवून आणतात.

उदा. Latvian Librarian Blogs http:// bibliotekari.blogspot.com

## वेब्लॉग्जची वैशिष्टये :

1.वेब्लॉग्ज हे वैयक्तिक असतात. 2.वेब्लॉग्जची माहिती क ालक्र माने येते. 3.वेब्लॉग्ज मधील माहिती अद्यायवत असते. 4.वेब्लॉग्ज मधुन नवीन विषयाची माहिती मिळते.

याप्रकारचे ब्लॉग वेब 2.0 तंत्रज्ञानाअंतर्गत ग्रंथालयात वापरता येतात. त्यासाठी ग्रंथपालाने स्वतःचा ब्लॉग तयार करणे आवश्यक आहे याचा फायदा ग्रंथालयातील सेवासुविधा वृंध्दिगत करण्यासाठी होतो.

## टिवटर (Twitter):

टिवटर हे लहान संदेश प्रसारणासाठीचे उपयुक्त वेब 2.0 अंतर्गत तंत्रज्ञान आहे. 2006 साली जॅक डोरसे यानी ही संक ल्पना प्रत्यक्षात आणली. यामध्ये संदेश हा 140 कॅरेक्टर एवढयाच लांबीचा पाठवीता येतो. टिवटरच्या माध्यमातून आपली मते, घटना, बातम्या, नवीन संकल्पना यांची देवाणघेवाण करणे ,समुहाला संदेश पाठवीने हे शक्य होते. एस.एम.एस. सारख्या सेवाना पर्याय म्हणून टिवटर वापरले जाते. टिवटरच्या सेवा देणाऱ्या वेबसाईटवर जाउन नोंदणी करून स्वतःचे प्रोफाईल तयार करावयाचे त्यानंतर दुसऱ्याला संदेश पाठवीता येतात. आज अनेक प्रसारमाध्यमे टिवटरच्या माध्यमातून संपक साधतात. ग्रंथालय वाचकांशी सतत संपक ठेवण्यासाठी त्याना तात्काळ संदेश देण्यासाठी किंवा एखाद्या मुद्यावर वाचकांचा प्रतिसाद एकत्र करण्यासाठी टिवटर या तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करता येतो.

## संदर्भसूची

1) कोण्णूर एम. (2008) ,ग्रंथालय माहितीशास्त्र कोश, पुणेः डायमंड प्रकाशन.
2) थोरात ,लक्ष्मण (2007) ग्रंथालय माहितीशास्त्र , पुणेः डायमंड प्रकाशन.
3) फडके ,द.ना. (2009) ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण , सुधारीत तीसरी आवृती , पुनर्मुद्रन , पुणेः डायमंड प्रक ाशन.
4) शर्मा, प्रल्हाद ( 2002) कम्प्युटर और पुस्तकालय , जयपूर : अंकित पब्लिकेशन्स.
5) फडके ,द.ना. (2009) लायब्ररी 2.0 तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात उपयोग : वेब 2.0 तंत्रज्ञानाची ओळख ;ज्ञानगंगोत्री, जुलै ते ऑगस्ट ,पाने 10 ते 24 ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण , सुधारीत तीसरी आवृती , पुनर्मुद्रन , पुणेः डायमंड प्रकाशन.
6) Hanif, N. M. (2009) Need for web 2.0 Technology for the libraries .7th International CALIBER. pp 331-334. Ahmadabad.
7) MacAfee, A. (2008) Enterprise 2.0: The Dawn of Emergent Collaboration. MIT Sloan Management Review 47 (3), pp. 21-28.